जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/४७०७ /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- ०२/०५/२०२४

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे ज्या लोकसभा मतदार संघात जे मतदार नाहीत त्यांनी त्या मतदार संघात न थांबणेबाबत.

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.४३७/६/१/ECI/PN/23/2024 DATE 16.03.2024 अन्वये १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला असुन दिनांक १६/०३/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहीता अस्तित्वात राहील. ३५ बारामती लोकसभा मतदार संघात मतदान दिनांक ०७/०५/२०२४ रोजी होणार आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ३५ बारामती लोकसभा मतदार संघात (२०२ पुरंदर, २०३ भोर , २११ खडकवासला विधानसभा मतदार संघाचा) समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.४६४/आय.एन.एस.टी./२००७/पी.एल.एन.-१, दिनांक ०८/०१/२००७ व दिनांक २७/०२/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकीय व्यक्तीवर जर ते त्या मतदार संघाचे मतदार नसतील तर त्या मतदार संघात थांबणेबाबत प्रतिबंध करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सर्व राजकीय व्यक्तींना किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तींस ते ज्या लोकसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या लोकसभा मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दिनांक ०५/०५/२०२४ चे १८.०० वा. पासून ते दिनांक ०७/०५/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) सर्व राजकीय व्यक्तीं किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या लोकसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि. ०२/०५/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- ०२/०५/२०२४

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/५७०८ /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- 02/05/२०२४

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मतदान केंद्राचे १०० मीटर चे परिक्षेत्रातील व्यवसायीक दुकाने व आस्थापना बंद ठेवणे बाबत आदेश.

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.४३७/६/१/ECI/PN/23/2024 DATE 16.03.2024 अन्वये १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला असुन दिनांक १६/०३/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहीता अस्तित्वात राहील. ३५ बारामती लोकसभा मतदार संघात मतदान दिनांक ०७/०५/२०२४ रोजी होणार आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ३५ बारामती लोकसभा मतदार संघात (२०२ पुरंदर, २०३ भोर, २११ खडकवासला विधानसभा मतदार संघाचा) समावेश असुन ३५ बारामती लोकसभा मतदार संघात एकुण १२७ मतदान केंद्रे (इमारत) मधील ६१८ बुथवर मतदान होणार आहे. मतदान सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर मतदान केंद्रांच्या परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ३५ बारामती लोकसभा मतदार संघात १२७ मतदान केंद्र (इमारत) व (६१८ बुथवर) १०० मीटर परिसरात दिनांक ०७/०५/२०४४ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) १२७ मतदान केंद्रांचे (इमारतीचे) १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यवसायीक दुकाने, रेस्टॉरन्ट, टपऱ्या (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवावेत.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील. सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.02/05/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- 02/05/२०२४

पोलीस सह आयुक्त * पुणे शहर *

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

Scanned with OKEN Scanner